महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

# सहायक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य मुंबई.

**धारिका क्रमांक :२१६१(२)/६५४६/दहा** **जाहिरात क्रमांक : ०३/२०१६**

आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या आस्थापनेवरील **सहायक आयुक्त (औषधे) गट-अ, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य मुंबई** च्या, **एका** पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| जात प्रवर्ग | अ. जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | एकूण मागासवर्गीय | अमागास | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १@ | | | | | | | | | | १ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.** | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | -- | | | | | | | | | | -- |
| **महिला** | -- | | | | | | | | | | -- |
| **खेळाडू** | -- | | | | | | | | | | -- |
| **अपंग** | **सदर पद चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (Locomotor Disability or Cerebral Palsy) OR श्रवण शक्तीतील दोष (Hearing Impairment) अपंगांसाठी आरक्षित** | | | | | | | | | | |

**(@ अपंगांचे पद)**

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सुचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे

**२.२** विचाराधीन पदाकरिता अपगांसाठी पद आरक्षित आहे सुधारीत दिनांक शासन निर्णय क्र. एफ़डीएस-१२१५/प्र.क्र.२९/१५/औषधे-१, दि. २० फेबुवारी,२०१५ नुसार. तसेच केद्र शासनाच्या सामाजिक न्याय व आधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली यांनी प्रसिध्द केलेल्या दि.१८.०१.२००७ व दि.१५.३.२००७ रोजीची अधिसूचना, भागशासन निर्णय क्र. न्यायाप्र/२००९/प्र. क्र.९/सुधार -३ दि.१३ ऑगस्ट २००९ च्या अनुषंगाने १) श्रवण शक्तीतील दोष (Hearing Impairment) २) चलनवलन विषयक विकलांगता व मेंदूचा अर्धांगवायू (Locomotor Disability or Cerebral Palsy) या अपंग प्रवर्गातील उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करु शकतात.

**३. वेतनश्रेणी : :** रु.१५,६००-३९,१००+ ग्रेड पे रु.५,४००/- व इतर भत्ते.

**४. पात्रता- उमेदवार भारतीय नागरिक असावा.**

**४.१** वय- **दिनांक १ मे, २०१६ रोजी ४५ वर्षा पेक्षा जास्त नसावे.**

**४.२** महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**४.३** शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.(**मुलाखतीसाठी पाचारण केल्या गेलेल्या खेळाडू उमेदवारांनी त्यांची खेळाडू असल्याची प्रमाणपत्रे क्रिडा संचालनालयाकडून प्रमाणित करुन घ्यावीत**).

**४.४** अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोगाकडून विचार करण्यात येईल. परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल.अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध् उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च् शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरीष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.

४.५ शैक्षणिक अर्हता :- Degree in Pharmacy or Pharmaceutical Chemistry or in Medicine with specialisation in Clinical Pharmacology or Microbiology from a University established in India by Law. **AND**

४.६ **अनुभव :- Experience gained after acquiring above qualifications in the manufacture or testing of drugs or enforcement of the provisions of the act for a minimum period of five years.**

४.७ **Have adequate knowledge of Marathi so as to be able to speak read write Marathi with facility.**

४.८ **Preference may be given to candidates having post-graduate degree in any one of the subjects mentioned in clause 4.5 above, or degree in law or research experience in the synthesis and testing of drugs or both.**

४.९ **Provided further that, the age limit may be relaxed in the case of candidates who possess exceptional qualification or experience or both.**

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या किंवा अन्य योग्य निकषां आधारे निकष निश्चित करून अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. **चाळणी परीक्षा झाल्यास अंतिम गुणवत्ता यादी ही चाळणी परीक्षा व मुलाखतीतील एकत्रित गुणावर आधारित असेल.** चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

६. **कर्तव्ये व जबाबदा-या:-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

७. **शुल्क** : **१)अमागास - रु.५२३/- २)मागासवर्गीय - रु.३२३ /-**

८. **अर्ज करण्याची पद्धत :-**

८.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

८.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज http://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १८ जानेवारी, २०१६ ते दिनांक ७ फेब्रुवारी, २०१६** या कालावधितच सादर करणे आवश्यक राहील.

८.३ **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या http://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

८.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

८.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-
(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) क्रेडिट कार्ड (३) डेबिट कार्ड (४) नेटबँकिंग (५) संग्राम केंद्र / सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

८.६ http://mahampsc.mahaonline.gov.inयेथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलब्ध आहे.

८.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा:-
(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील माझे खाते या लिंक वर क्लिक करावे.
(२) “माझे खाते ” या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या/ न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ‘Unpaid’ असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी ‘Pay Now’ अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) ‘Pay Now’ या लिंक वर क्लिक केल्यानंतर ३ पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३) चलनाद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंग च्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्या पुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

(८) जे उमेदवार भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्काचा भरणा करतील असे उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. जर हा दुसरा दिवस कार्यालयीन सुट्टी अथवा रविवारचा असेल तर उमेदवार सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.

**९.** चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास चाळणी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१०.** चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**११.** आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधन आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

**१२. उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**१३. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ७ फेब्रुवारी, २०१६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१४. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावया चे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ८ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**१५. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८ जानेवारी, २०१६**

**श्री. शं. पाठक**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**